# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 May 2025

Time 17.20 to 17.30

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ मे २०२५ सायंकाळी ५.२०**

****

- ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दहशतवादी तळच नव्हे तर दहशतवाद्यांचे मनसुबे आणि दु:साहसही धुळीस मिळवल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- बेघर बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक योजनेला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी –कृत्रीम वाळू धोरणालाही मान्यता
- राज्य शिक्षण मंडळाचा दहावीचा तसंच सीबीएसईचा बारावी आणि दहावीचा निकाल जाहीर

आणि

- आयपीएलच्या उर्वरित सामन्यांचं सुधारित वेळापत्रक जारी–तीन जूनला अंतिम सामना

****

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून फक्त दहशतवादी तळच नव्हे तर दहशतवाद्यांचे मनसुबे आणि दु:साहसही धुळीस मिळवल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधानांनी आज आदमपूर इथं वायूदलाच्या तळाला भेट देऊन सैनिकांशी संवाद साधला, देशाच्या सैनिकांच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल संपूर्ण देश कृतज्ञ असल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली. सैनिकांचं कौतुक करतांना पंतप्रधान म्हणाले –

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत देशाच्या पश्चिम सीमेच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीला तीनही

संरक्षण दलांचे प्रमुख सीडीएस जनरल अनिल चौहान, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी, सैन्यदल प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी तसंच संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग उपस्थित होते.

****

'ऑपरेशन सिन्दूर' बाबत जनजागृतीच्या उद्देशानं भारतीय जनता पक्षानं आजपासून देशभरात जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेला 'तिरंगा यात्रा' असं नाव देण्यात आलं असून, यातून, पाकिस्तानच्या विरोधात भारतीय लष्करानं केलेल्या यशस्वी कारवायांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. राजधानी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर आज संध्याकाळी यानिमित्तानं विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

जम्मू काश्मीरच्या शोपिंया जिल्ह्यात शुक्रू केलर जंगल परिसरात आज सकाळी सुरक्षादलांशी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी मारले गेले. हे दहशतवादी लष्कर ए तैयबाच्या द रेझिस्टन्स फ्रंट या शाखेचे असण्याची शक्यता असून त्यांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे. या परिसरात सुरक्षा दलांकडून शोध मोहीम सुरू आहे.

****

भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना आज सेवानिवृत्त झाले. सर्वोच्च न्यायालयाचे एक्कावन्नावे मुख्य न्यायाधीश म्हणून त्यांचा कार्यकाळ आज पूर्ण झाला. गेल्या वर्षीच्या चोवीस नोव्हेंबरला त्यांनी हा पदभार स्वीकारला होता. न्यायमूर्ती खन्ना यांनी आपले उत्तराधिकारी म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची शिफारस केली आहे. न्यायमूर्ती गवई हे भारताचे बावन्नावे सरन्यायाधीश म्हणून पदग्रहण करतील.

****

राज्यातल्या, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक, ही योजना राज्यात राबवण्याला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी राज्यातल्या एकोणतीस महापालिका क्षेत्रांमध्ये एकतीस मोबाईल व्हॅन्स घेण्यासाठी आठ कोटी रुपयांच्या निधीलाही मान्यता देण्यात आली.

पर्यावरणाची हानी टाळण्याच्या दृष्टीनं राज्यात कृत्रीम वाळू अर्थात एम सँड धोरणाला मान्यता देण्यात आली आहे, प्रत्येक जिल्ह्यात पन्नास व्यक्ती किंवा संस्थांना एम सँड प्रकल्प स्थापन करण्यासाठी उद्योग विभागाद्वारे सवलती देण्यात येतील तसंच अशा प्रत्येक प्रकल्पाला प्रति ब्रास दोनशे रुपयांची सवलत देण्याचा निर्णयही आज मंत्रिमंडळानं घेतला.

राज्य वेतन त्रुटी निवारण समितीनं सादर केलेला अहवाल स्वीकारत, त्यासाठीचा ऐंशी कोटी रुपयांचा भार राज्य शासनानं स्वीकारण्याचा निर्णय आजच्या या बैठकीत घेण्यात आला.

राज्यातल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रांत रूपांतरित करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून अद्ययावतीकरण धोरण राबवण्याला आज मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातल्या उपकेंद्रासाठी नागपूर जिल्ह्यातल्या कामठी तालुक्यात चिंचोली इथे वीस हेक्टर तेहतीस आर जागा देण्याचा, तसंच, नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना 'होम स्वीट होम' अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजाचं मुद्रांक शुल्क कमी करून फक्त एक हजार रुपये आकारण्याचा निर्णयही आज मंत्रिमंडळानं घेतला आहे.

****

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षांचे निकाल आज जाहीर झाले. राज्यात एकूण ९४ पूर्णांक १० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून परीक्षेतले सर्व उत्तीर्ण विद्यार्थी, त्यांचे पालक आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचं, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केलं आहे. उत्तीर्ण न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांनी नाउमेद न होता पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होऊन यश संपादन करावं, असं आवाहनही शिक्षणमंत्र्यांनी केलं आहे.

नऊ विभागीय मंडळांमधून एकूण नऊ हजार पाचशे पंचाऐंशी दिव्यांग विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले, त्यातले आठ हजार आठशे चव्वेचाळीस विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांच्या निकालाची टक्केवारी ९२ पूर्णांक २७ अशी उल्लेखनीय आहे. या विद्यार्थ्यांचंही भुसे यांनी अभिनंदन केलं आहे.

पुणे विभागाचा निकाल ९४ पूर्णांक ८१ टक्के, नागपूर - ९० पूर्णांक ७८, छत्रपती संभाजीनगर ९२ पूर्णांक ८२ टक्के, मुंबई ९५ पूर्णांक ८४, कोल्हापूर - ९६ पूर्णांक्र ७८, अमरावती - ९२ पूर्णांक ९५, नाशिक - ९३ पूर्णांक ०४ टक्के, लातूर - ९२

पूर्णांक ७७ तर कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजे ९८ पूर्णांक ८२ टक्के इतका लागला आहे.

छत्रपती संभाजीगर विभागात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा निकाल ९३ पूर्णांक ६० शतांश, जालना ९१ पूर्णांक ३३, बीड ९६ पूर्णांक ४७ शतांश, परभणी ८९ पूर्णांक २४ शतांश तर हिंगोली जिल्ह्याचा निकाल ८९ पूर्णांक ०७ शतांश एवढा लागला आहे.

लातूर विभागात यावर्षी धाराशिव जिल्हा हा ९५ पूर्णांक ३७ शतांश निकालासह सर्वप्रथम आला आहे. लातूर जिल्हा ९२ पूर्णांक ३६ शतांश घेऊन द्वितीय तर नांदेड जिल्हा ९१ पूर्णांक ९३ शतांश निकालासह घेऊन तृतीय आला आहे.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसीईच्या दहावी आणि बारावी परीक्षांचा निकाल आज जाहीर करण्यात आला. बारावीच्या परीक्षेत ८८ पूर्णांक ३९ टक्के विद्यार्थी तर दहावीच्या परीक्षेत त्र्याण्णव पूर्णांक सहासष्ट टक्के उत्तीर्ण झाले आहेत. सीबीएसईच्या निकालातही मुलींनी बाजी मारली आहे. www.cbse.gov.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना आपला निकाल पाहता येणार आहे.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ–बीसीसीआयनं आयपीएल स्पर्धेतल्या उर्वरित सामन्यांचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. या वेळापत्रकानुसार येत्या शनिवारी म्हणजे १७ मे पासून आयपीएल स्पर्धेला पुन्हा सुरुवात होणार आहे. या स्पर्धेचा अंतिम सामना तीन जूनला होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणाहून देण्यासाठी ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत ३१ मे पर्यंतपूर्ण नोंदणी करावी, असे निर्देश मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. बावनकुळे यांनी नागपूर इथून आज दूरदृष्य प्रणालीद्वारे खरीप हंगामाचा आढावा घेतला. ही नोंदणी केली नसलेल्या शेतकऱ्यांना वीज बिलाची सवलत मिळणार नसून ॲग्रीस्टॅक नोंदणी नसणाऱ्या शेतकऱ्यांना जुलैपासून विजबिल देण्यात येईल असं त्यांनी सांगितलं.

****

रासायनिक खतांवरचं शेतीचं अवलंबित्व कमी करत जैविक खतांचा वापर वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे निर्देश परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज जिल्हा यंत्रणा प्रमुखांना दिले. त्यांनी खरीप हंगाम २०२५ ची आढावा बैठक आज परभणी इथे घेतली त्यावेळी त्या बोलत होत्या. फळबाग लागवड योजना आणि रेशीम शेती बाबत जनजागृती करण्याच्या सूचना बोर्डीकर यांनी यावेळी दिल्या. परभणी जिल्ह्यात येत्या पंधरा तारखेपासून कापूस बियाणे विक्रीसाठी उपलब्ध होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. येत्या १५ दिवसांत जिल्ह्यातल्या शेतरस्त्यांची कामं पूर्ण करण्याचे, तसंच कृषि निविष्ठा उपलब्ध असल्याची खात्री करण्याचे आदेशही पालकमंत्र्यांनी यावेळी दिले.

****